# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**मौजे चिंबीपाडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकारी मुख्यालयी वास्तव्य करीत नसल्याबाबत**

**(१) २९०६ (१५-०१-२०१५). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिंबीपाडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्किय अधिकारी शासनाचा नियम असतांनाही मुख्यालयी वास्तव्य करीत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरभाडे बंद केल्यावर गटविकास महिला अधिकारी, श्रीमती करुण जुईकर यांना त्यांच्या कक्षात जावून गैरवर्तन केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्सास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, संबधित वैद्यकिय अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मंजुर दोन पदांपैकी एकच पद भरले होते व निवासस्थान वास्तव्यास अयोग्य होते.

(२) गटविकास अधिकारी, पंचायत समिती भिवंडी यांच्या दि. १.१०.२०१४ च्या आदेशानुसार संबंधित वैद्यकीय अधिकारी यांनी दि. ०७.१०.२०१४ रोजी त्यांची भेट घेतली. सदर भेटीदरम्यान त्यांनी उध्दट व उर्मटपणे वर्तन केल्याचे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी त्यांच्या अभिप्रायात नमुद केले आहे.

(३) अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचे मार्फत चौकशी करण्यात आलेली आहे.

(४) याबाबत संबंधित वैद्यकीय अधिकारी यांना जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांच्या स्तरावरुन त्यांच्या दि.०७.०४.२०१५ च्या पत्रान्वये समज देण्यात आलेली आहे.

**बामणोली व तापोळा (ता.जावळी, जि.सातारा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांत अधिकारी व कर्मचारी उपस्थित नसल्याबाबत**

**(२) ८९९८ (०८-०४-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बामणोली व तापोळा (ता.जावळी, जि.सातारा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांना जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास भेट दिली असतां आरोग्य अधिकाऱ्यांसह एकही कर्मचारी उपस्थित नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांसह, कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

दि. १०/०१/२०१५ रोजी भेट दिली.

(२) नाही. तथापि मा. अध्यक्ष जि.प. सातारा यांचे भेटीचे अनुषंगाने दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) दि.१०/०१/२०१५ रोजी अनुपस्थित असलेल्या कर्मचाऱ्याविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ भाग दोन-३ नुसार निलंबनाची कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) लागू नाही.

---

**उष्माघातांने मृत्यू पावलेल्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(३) २८७८२ (१३-०१-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भासह बुलढाणा जिल्हयात गत ५ वर्षात उष्माघाताने ३६७ जणांचा मृत्यू गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नैसर्गिक आपत्ती अंतर्गत उष्माघाताने बळी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना सानुग्रह अनुदान दिले गेले नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उष्माघातांच्या बळींचा नैसर्गिक आपत्तीमध्ये समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०४-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे. अमरावती विभागात वाशिम जिल्ह्यात ०२ व्यक्तींचा तर नागपूर विभागात नागपूर-२८, भंडारा-०३, चंद्रपूर-०२ व गडचिरोली ०२ असे एकूण ३७ जणांचा उष्माघाताने मृत्यू झालेला आहे.

(२) उष्माघाताने मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या कुटूंबियांना आर्थिक मदत अनुज्ञेय नसल्याने आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात न्याय वैद्यकीय डॉक्टरांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४) ३२८६९ (२१-०१-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात न्याय वैद्यकीय डॉक्टरांची पदे रिक्त असल्याने बलात्काराबरोबरच गळफास, खुनाच्या बाबतीतील न्यायालयाच्या दृष्टीने अपेक्षित अशी नीट चिकित्सा होत नसल्याने आरोपी सुटत असल्याचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त जागा भरण्यासाठी मागील १५ वर्षे शासनामार्फत प्रयत्न केले तथापि अद्यापही जागा भरण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जागा रिक्त राहण्याची कारणे काय आहेत व त्या तातडीने भरण्याबाबत शासनामार्फत कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यामध्ये शासकीय रुग्णालयाच्या विरोधात तक्रारींची जन सुनावणी राष्ट्रीय मानवाधिकार आयोग आणि जन आरोग्या अभियानाबाबत**

**(५) ४०४८७ (१०-०५-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये शासकीय रुग्णालयाच्या विरोधात तक्रारींची जन सुनावणी राष्ट्रीय मानवाधिकार आयोग आणि जन आरोग्या अभियानाच्या वतीने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आयोजित केली होती, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर सुनावणी वेळी खाजगी रुग्णालयाच्या तक्रारीवर जन सुनावणी घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, खाजगी रुग्णालयाची सुनावणी न घेण्याची काय कारणे आहे व जन सुनावणी घेण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०३-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर जन सुनावणीसाठी खाजगी रुग्णालयातील अधिकारी उपस्थित होते. परंतु खाजगी रुग्णालयाची सुनावणी राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने घेतली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किनवट व माहूर (जि.नांदेड) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय व ट्रामा केअर मधील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(६) ५१४४१ (२१-२-२०१६). श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनवट व माहूर (जि.नांदेड) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय व ट्रामा केअरमध्ये डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी मा. मुख्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य मंत्री, संचालक, उपसंचालक नांदेड यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ ऑक्टोबर २०१५ रोजी वा त्यासुमारास सदर रिक्त पदे भरण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उपजिल्हा रुग्णालय ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर मधील रिक्त पदे भरणेबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०३-२०१९) :**- (१) हे अंशत: खरे आहे.
नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा (५० खाटा) व ट्रामा केअर युनिट (२० खाटा) ही रुग्णालये कार्यन्वित असुन सदर रुग्णालयांमध्ये गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण ७३ पदे मंजुर असुन ५८ पदे भरलेली व १५ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) शासनामार्फत रिक्त पदे भरण्याबाबत केलेली कार्यवाही पुढीलप्रमाणे आहे:-

वैद्यकीय अधिकारी,गट-अ, ग्रेड पे रु.५४००/- संवर्गाची रिक्त पदे स्थायी स्वरुपात भरण्याकरीता शासनाने स्वतंत्र निवड मंडळामार्फत दि. १६.०४.२०१६ रोजी ४१२ रिक्त पदांची, दि. ०८.०९.२०१७ रोजी ३९४ पदांची जाहिरात प्रसिध्द करुन पदभरतीची निवड प्रक्रिया राबविण्यात आली आहे. तसेच दि. २७.१२.२०१८ रोजी ८७७ रिक्त पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

सन २०१६-१७ मध्ये झालेल्या पदभरतीत उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा व ग्रामीण रुग्णालय माहुर येथील गट-क व गट-ड संवर्गाची बहुतांश रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत.

वित्त विभाग, शासन निर्णय दि. १६.०५.२०१८ अन्वये गट-क व गट-ड संवर्गाची रुग्णसेवेशी संबंधित १०० टक्के रिक्त पदे भरण्यास मान्यता दिलेली आहे. भरती प्रक्रियेस न्यायालयीन स्थगिती देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दाभाडी (ता.बदनापूर, जि.जालना) येथील प्राथमिक आरोग्यकेंद्रावर कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकारी नसल्याबाबत**

**(७) ५१९३६ (११-०५-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाभाडी (ता.बदनापूर, जि.जालना) येथील प्राथमिक आरोग्यकेंद्रावर कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकारी नसल्याची घटना दिनांक ८ जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्रावर वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने परिसरातील गावातील रुग्णांना नाईलाजास्तव खासगी रुग्णालयात उपचार करावा लागतो, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती उपययोजना केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, अद्यापर्यंत कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकारी नियुक्त केला नसल्याची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जेनेरिक औषधे बाजारात उपलब्ध असताना महागडी औषधे डॉक्टरांकडून लिहून दिली जात असल्याबाबत**

**(८) ५६०६८ (३०-०८-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) जेनेरिक औषधे बाजारात उपलब्ध असताना महागडी औषधे डॉक्टरांच्या सल्ल्याने दिली जात असून जनतेला परवडत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वसामान्य जनतेला परवडणारी जेनेरिक औषधे डॉक्टरांकडून औषधे लिहून देतांना त्यांची जेनेरिक नावे देखील लिहून देणेबाबत डॉक्टरांवर निर्बंध घालता येईल किंवा कसे याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी व योग्य त्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०३-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत महाराष्ट्रातील सर्व आरोग्य संस्थांमधून रुग्णांना आवश्यक सर्व औषधे मोफत दिली जातात त्याप्रमाणे मार्गदर्शक सूचना दि.७.५.२०१३ च्या शासन पुरक पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये रक्ताच्या संक्रमाणातून एचआयव्हीची लागण झाल्याबाबत**

**(९) ५८१६५ (३०-०८-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये रक्ताच्या संक्रमाणातून एचआयव्हीची लागण झाल्याचे २७३ रुग्ण आढळल्याचे दिनांक १ जुन, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन एड्सबाबत जनजागृतीमध्ये कमी पडत असून अशा घटना घडणाऱ्या संबंधित रुग्णालय किंवा रक्तपेढयांवर मात्र अद्याप कोणतीही कारवाई करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रक्तांच्या संक्रमणातून एचआयव्ही ची लागण थांबविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०३-२०१९) :** (१) हे अशंत: खरे आहे.

ऑक्टोंबर २०१४ ते मार्च २०१६ पर्यंत १८२ रुग्ण आढळून आले.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्रात सर्व नॅको सहाय्यित रक्तपेढयांतील रक्त संक्रमण अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, समुपदेशक व परिचारीका यांचे प्रशिक्षण व उजळणी प्रशिक्षण घेतले जाते. त्यात दुषित रक्त संक्रमणाद्वारे आजार न होण्यासाठी काळजी घेण्याचे प्रशिक्षण दिले जाते .

भव्य रक्तदान शिबीरा ऐवजी गरजेनुसार रक्तपेढयानी छोटी रक्तदान शिबीरे आयोजित करणे दि.०४.०४.२०१२ व २०.०६.२०१४ रोजीचे नॅको नवी दिल्ली यांचे मार्गदर्शक सुचनाप्रमाणे महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था अंतर्गत नॅको सहाय्यित रक्तपेढया या रक्तसंकलन व संक्रमण प्रक्रियेची अमंलजावणी केली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर (जि.पालघर) तालुक्यातील ग्रामीण कुटीर रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रातील पदे रिक्त असल्याबाबत**

**(१०) ८१९५८ (१५-०४-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर तालुक्यात ग्रामिण कुटीर रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी कर्मचारी यांची पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय;

(२) तसेच, या दुर्गम भागातील आरोग्य केंद्रात औषधांचा तुटवडा असून सर्पदंशावर उपचारांकरिता औषध सामुग्री नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आदिवासी भागातील रुग्णांना पुर्ण क्षमतेने औषध उपचार मिळण्यासह पदे तातडीने भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पालघर तालुक्यात एकुण ३ ग्रामीण रुग्णालये व १० प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यन्वित आहेत. सदर आरोग्य संस्थांमध्ये गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण ९४ पदे मंजुर असुन ७१ पदे भरलेली व २३ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही.

पालघर तालुक्यातील आरोग्य संस्थांमध्ये औषधसाठा व सर्पदंश उपचाराकरीता लसीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) व (५) म.वै.आ.से. गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरणेबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

ठाणे व पालघर जिल्हयातील राज्यस्तरीय गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणेबाबत कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

---

## मुंबई बेहरामपाडा येथे इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेतील मृतकांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(११) ८४७५३ (२१-०४-२०१७). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील बेहरामपाडा झोपडपट्टी, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व) या ठिकाणी इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत ६ मुलांचा दुदैवी मृत्यु ओढवल्याने मृतकांच्या कुटुंबियांना तसेच जखमींना शासनामार्फत सानुग्रह अनुदान क्रमशः रू.५ व रू.२ लाख प्रत्येकी देण्याची मागणी विभागातील जागरूक नागरीक, लोकप्रतिनिधी, विविध सामाजिक संघटनांचे, भाडेकरू संघटनांचे पदाधिकारी यांनी मा. मुख्यमंत्री, राज्य मंत्री (नगर विकास), मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी स्वरूपात केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी भारतीय घटनेच्या कलम २१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकार हमीचे उल्लंघन झाल्याचे त्याचबरोबर या कलमांतर्गत सानुग्रह मदत प्रदान करण्याची शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रकरणी शासनामार्फत कोणती प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०४-२०१९) :** (१) सदर बाब निदर्शनास आलेली आहे.
(२) (३) व सदर घटना विहित नैसर्गिक आपत्तीअंतर्गत येत नसल्याने मदत अनुज्ञेय नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरात डॉक्टरांच्या चिठठीशिवाय (प्रिस्किप्शन) झोपेच्या औषधांची विक्री होत असल्याबाबत

**(१२) ९१००४ (२१-०८-२०१७). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉक्टरांच्या चिठठीशिवाय (प्रिस्किप्शन) झोपेच्या औषधांची विक्री करण्यात येऊ नये असे शासनाचे आदेश असतांनाही नागपूर शहरात औषधांची विक्री होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी औषध विभागातर्फे एका घाऊक विकेत्याविरुध्द तहसील पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तदनुसार दोषीविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,?

**श्री. गिरीष महाजन (१०-०४-२०१९) :** (१) नागपूर येथे डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय झोपेच्या औषधांची रुग्णांना विक्री होत असल्याचे माहे मे, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आलेले नाही. मात्र नागपूर येथील घाऊक विक्रेता मे.अजित फार्माटिक्स या पेढीची अन्न व औषध प्रशासनाने तपासणी केली असता सदर पेढीने Nitravet Tablets १० mg व Nitravet Tablets १० mg (Nitrazepam १० mg /५ mg) या झोपेसाठी लागणाऱ्या गोळयांची खोटी विक्री बिले तयार केली असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) घाऊक विक्रेता मे.अजित फार्माटिक्स, नागपूर या पेढीने झोपेसाठी लागणाऱ्या गोळयांची खोटी विक्री बिले तयार केल्याने सदर गोळया कोणास विक्री केल्या बाबत तपास करण्यासाठी पेढीच्या मालकाविरुध्द कोतवाली, पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबर अहवाल नोंदविला आहे.
(३) होय, मे.अजित फार्माटिक्स, नागपूर या घाऊक विक्रेत्याने खरेदी केलेल्या Nitravet Tablets १० mg च्या स्ट्रीस पैकी ६८ स्ट्रिप्सची विक्रीची ज्या किरकोळ विक्रेत्याच्या नावे विक्री बिले बनवली त्या विक्रत्यास प्रत्यक्षात पुरवठा केला नाही. तसेच Nitravet Tablets ५ mg च्या ५ स्ट्रीस खोटी विक्री बिले बनविल्याचे तापमान आढळून आले.

(४) मे.अजित फार्मास्ट्रिक्स, नागपूर या घाऊक विक्रेत्याने वर नमुद केलेल्या खोटया बिलांवर औषधाचा साठा प्रत्यक्षात कोणाला विकला याचा शोध घेण्यासाठी सदर मालकाविरुध्द कोतवाली पोलिस स्टेशन, नागपूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत. सदर घाऊक विक्रेत्याचे घाऊक औषध विक्रीचे परवाने तसेच गोडावून परवाने दिनांक २० ऑगस्ट, २०१७ रद्द करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रामधील डॉक्टर रजेवर असल्याबाबत**

**(१३) ९१३११ (१९-०८-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रामधील तब्बल ४८ डॉक्टर विविध कारणांमुळे गत वर्षभरापासून रजेवर असल्यामुळे नागरीकांना आरोग्य सेवा मिळण्यास विलंब होत असून त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रजेवर गेलेल्या डॉक्टरांच्या गैरहजेरीत रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) ज्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी दोन वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत तेथील एक वैद्यकीय अधिकारी, ज्या प्रा.आ.केंद्राच्या ठिकाणी एकही वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नाही त्या ठिकाणी पाठवून त्यामार्फत स्थानिक जनतेस आरोग्य सेवा सुविधा पुरविण्यात येत आहे. त्याप्रमाणे संबंधित तालुका आरोग्य अधिकारी याबाबतचे संनियंत्रण करीत असून सर्व ठिकाणी किमान एकतरी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईल याची दक्षता घेण्यात येत आहे. त्यामुळे स्थानिक रुग्णांना आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध होत असल्याने त्यांचे हाल होत नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुडूस (ता.वाडा, जि.पालघर) प्राथमिक आरोग्य केंद्रात**
**शिकाऊ डॉक्टर कार्यरत असल्याबाबत**

**(१४) ९५६७४ (२७-१२-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडूस (ता.वाडा, जि.पलघर) प्राथमिक आरोग्य केंद्रात तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांविना शिकाऊ डॉक्टर कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, उक्त ठिकाणी एमबीबीएस व बीएएमएस अशा दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांची जागा रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबत तालुका व जिल्हा परिषद अधिकाऱ्यांकडे मागणी व निवेदन देऊनही या केंद्रात वैद्यकीय अधिकारी नियुक्त होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय चौकशीनुसार तातडीने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
प्राथमिक आरोग्य केंद्रात आकृतीबंधानुसार तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्याची पदे मंजुर नाहीत.
(२) हे अंशतः खरे आहे.
प्रा.आ.कें. कुडूस येथे वैद्यकीय अधिकारी, गट-अ पदावर बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे. तसेच गट-ब पदावर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे शिंदे (ता.जि.नाशिक) येथील आरोग्य केंद्रतील वैद्यकीय अधिकाऱ्याच्या गैरहजेरीबाबत**

**(१५) ९५९८१ (२७-१२-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे शिंदे (ता.जि.नाशिक) येथील नाशिक-पुणे महामार्गावरील आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी उपस्थित राहत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीबाबत ग्रामस्थांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा आरोग्य अधिकारी, नाशिक यांचेकडे वेळोवेळी लेखी व तोंडी तक्रार करून देखील अद्यापपावेतो काहीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, उपस्थित नसलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याबाबत शासनामार्फत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दैनिक महाराष्ट्र टाइम्स मध्ये बातमी आली होती.

(२), (३) व (४) चौकशी केली आहे.

वैद्यकीय अधिकारी यांनी मुख्यालयी राहून नागरिकांना आरोग्य सेवा देण्याबाबत पंचायत समिती नाशिक, आरोग्य विभाग यांनी जा.क्र./आरोग्य/३२४/२०१७ दि.१३.१०.२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोरेगाव (मुंबई) येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीतील धोकादायक ठरविलेल्या इमारतीमध्ये उपहारगृह चालविण्यास परवानगी देणा-या अधिका-यावर कारवाई करण्याबाबत**

**(१६) ९६४६९ (३०-१२-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीतील इमारत ही स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्टमध्ये धोकादायक ठरली असून या इमारतीत उपहारगृह चालवण्यासाठी पालिका प्रशासनाने मुदतवाढ दिल्याचे दिनांक १७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात पालिकेच्या गोरेगावमधील पी/दक्षिण कार्यालयाकडे तक्रार अर्ज देऊनही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर इमारतीत उपहारगृह चालविण्यारकरिता मुदतवाढ देणा-या पालिका अधिका-यांवर व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०४-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर इमारत स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्टमध्ये धोकादायक ठरली आहे परंतू मुदतवाढ देण्यात आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

या संदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य खाते पी/दक्षिण विभागात मुदतवाढी बाबतचा तक्रार अर्ज प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना विम्याची रक्कम तातडीने देण्याबाबत**

**(१७) १०१३५५ (२७-१२-२०१७). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयांतील ८१८८ केळी उत्पादक शेतक-यांनी हवामाना वर आधारीत फळपिक विमा द्वारे ६९ कोटी ९३ लाख रु भरला त्यापैकी २ हजार ८८१ शेतक-यांना २४ लाख ८० हजार एवढा विमा शेतक-यांना देण्यात आला होता उर्वरित शेतक-यांना आज पर्यंत विमा देण्यात आले नसल्याची बाब माहे ऑक्टोबर,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित शेतक-यांची १० जानेवारी रोजी मा.कृषी राज्यमंत्री यांनी मंत्रालयात सर्व संबंधित अधिकारी व विमा कंपनीचे प्रतिनिधी यांची बैठक घेऊनही आज पर्यंत शेतकऱ्यांना विमा मिळाला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शेतकऱ्यांना विम्याची रक्कम तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०४-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

नांदेड जिल्हयातील ८१८८ विमाधारक केळी उत्पादक शेतकऱ्यांपैकी २८८१ पात्र विमाधारक शेतकऱ्यांची केळी पिकासाठीची ३,२४,८०,०००/- रुपये नुकसान भरपाई दिनांक १० ऑक्टोबर,२०१८ रोजी संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे. भोकर महसूल मंडळातील उर्वरित शेतकरी केळी फळपिकाच्या हवामान प्रमाणकानुसार नुकसान भरपाईस पात्र नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद येथे राज्य कामगार विमा योजनेमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची असलेली रिक्त पदे**

**(१८) १०१६५३ (०६-०१-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद व अन्य रूग्णालयात राज्य कामगार विमा योजनेचे वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या (उदा.शल्यचिकित्सक, दंतशल्य चिकित्सक) रिक्त पदावर कंत्राटी पध्दतीने काम करण्यास इच्छूक असलेल्या बाहेरील उमेदवारांनी अर्ज केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर रिक्त असणाऱ्या पदांवर काम करण्यास इच्छूकांना वयोमर्यादेचे नियम दाखवून त्यांचे अर्ज नाकारले गेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बाहेरील उमेदवारांच्या वयोमर्यादेबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) विशेषज्ञ संवर्गातील पदे सरळसेवेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) हे खरे नाही.
सदर पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील असल्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जातात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर मधील कामगार रूग्णालयाच्या पुर्नबाधणीबाबत**

**(१९) १०१९२७ (०४-०१-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर मधील कामगार रूग्णालयाच्या धोकादायक १२ इमारती निष्कषित करून नव्याने २०० खाटांची अद्यावत उभारणी करणार असल्याचे माहे ८ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यादरम्यान जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) असल्यास, उक्त कार्यवाहीची सदयस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०४-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, उल्हासनगर ची इमारत राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्या मालकीची आहे. सदर रुग्णालय व निवासी इमारतींची पुनश्च: उभारणी करण्यात येत आहे.
(२) राज्य शासनाने दिनांक ३१.१०.२०१७ च्या पत्रान्वये सदर रुग्णालयाचे पुनर्विकास त्वरीत करण्याबाबत राज्य कामगार विमा महामंडळ मुख्यालयास कळविले होते. मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४.०५.२०१८, दिनांक ०६.०६.२०१८ व दिनांक ११.०९.२०१८ रोजी सदर रुग्णालयाच्या पुर्नबांधणीबाबत संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन राज्य शासनाकडून पाठपुरावा करण्यात आला आहे.
(३) सद्यस्थितीत CPWD मार्फत जागेचा survey करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील ग्रामीण रूग्णालयातील रिक्त पदांसह खाटांच्या श्रेणीत वाढ करण्याबाबत

**(२०) १०२६१२ (०३-०१-२०१८). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील ग्रामीण रूग्णालयातील वैद्यकिय अधिक्षक वर्ग-१, वैद्यकिय अधिकारी वर्ग -१, परिचारीका, एनआरएचएम, एएनएम तसेच अन्य काही पदे रिक्त असल्याने व ग्रामीण रूग्णालयाची ३० खाटांच्या ऐवजी १०० खाटांचे श्रेणीवाढ करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी तसेच लोकप्रतिनिधीनी मागील ३ वर्षापासून सातत्याने मा.मुख्यमंत्री, सार्वजनिक आरोग्यमंत्री, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, संचालक, सार्वजनिक आरोग्य सेवा, पुणे आदींकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमरास व तद्नंतर पुन्हा दि. ९ मार्च २०१७ रोजी मा.आरोग्य मंत्र्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०३-२०१९) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, जुन्नर येथील मंजुर, भरलेली व रिक्त पदांची माहिती खालीलप्रमाणे:-

तथापि रुग्णालय श्रेणीवर्धनाचा प्रस्ताव संचालनालयाद्वारा शासनाला सादर केला असुन ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

| अ.क्र. | तपशिल | मंजूर पद | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिक्षक | १ | १ | ० |
| २ | वैद्यकीय अधिकारी | ४ | ३ | १ |
| ३ | गट क | १६ | १६ | ० |
| ४ | गट-ड | ८ | ५ | ३ |
| एकूण | | २९ | २५ | ४ |

(३) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नविन रुग्णालय सुरु करणे अथवा रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करण्यासाठी जोड बृहत आराखडा तयार करण्यात येत असून जुन्नर येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी जोड बृहत आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**नागपूरातील राज्य कामगार विमा रुग्णालयामध्ये रूग्णांना सोनोग्राफीच्या उपचारापासुन वंचीत राहावे लागत असल्याबाबत**

**(२१) १०८७३७ (३१-०३-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरातील राज्य कामगार विमा रूग्णालयामध्ये उपचार घेण्याकरीता जात असलेल्या कामगार रूग्णांना सोनोग्राफीच्या उपचारापासुन वंचीत राहावे लागत असल्याबाबतचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रूग्णालयामध्ये नागपूर जिल्हयासह विदर्भातील दीड लाख कामगार व त्यांच्या कुटूंबियांना आरोग्यसेवा देण्यात येत असुन त्याठिकाणी अनेक वर्षाचा कालावधी होऊनही त्यांच्याकरीता पुरेशी सोयी अद्यापपर्यंत उपलब्ध झालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रूग्णालयात सन १९७६ पासुन एक सोनोग्राफी मशीन सुरू असुन त्यावरच लाखो रूग्णाचे उपचार झाले असुन त्या यंत्राची दोन ते अडीच वर्षापूर्वी मुदत संपुन कालबाहय झाल्यामुळे रूग्णांना खासगी रूग्णालयातुन महागडया दरात सोनोग्राफी करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या रूग्णालयाच्या शासनाने २५ लाख रूपयाचे नवीन सोनोग्राफी यंत्र मंजुर करण्याकरीता प्रस्ताव पाठविला असता त्यास अद्यापपर्यंत मंजुरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या राज्य विमा कामगार रूग्णालयांनी नवीन सोनोग्राफी यंत्राच्या प्रस्ताव पाठवुनही त्यास मंजुरी देण्याकरीता होत असलेल्या विलंबामागची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०४-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर रुग्णालयातील सोनोग्राफी मशिन बंद असल्यामुळे रुग्णसेवेला अडथळा येऊ नये म्हणून विमारुग्णांना CGHS दराने विनाशुल्क सोनोग्राफीची सुविधा खाजगी रुग्णालयामार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत नागपूर शहरासह विदर्भात एकूण ३,४३,४७० नोंदणीकृत विमाधारक असून सुमारे १३,७३,८८० लाभार्थी आहेत. या सर्वांना १७ राकावियो सेवा दवाखान्यामार्फत प्राथमिक वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत असुन राकावियो रुग्णालय, नागपूर मार्फत विशेषज्ञ बाह्य व आंतररुग्ण सेवा पुरविण्यात येतात.

(३) हे अंशत: खरे आहे.

सदर रुग्णालयातील सोनोग्राफी मशीन जुनी होऊन बंद पडल्याने विमारुग्णांच्या सेवेत अडथळा निर्माण होऊ नये याकरीता CGHS दराने ०३ खाजगी संस्थेमार्फत विमारुग्णांची सोनोग्राफी करुन घेण्यात येत असून त्याकरीता विमारुग्णांना खर्च करावा लागत नाही.

(४) व (५) हे खरे आहे.

आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांच्यास्तरावर प्रस्ताव विचाराधीन आहे.

---

**राज्य शासनाने शेती मालाला योग्य भाव देण्याबाबत**

**(२२) ११३०६९ (२०-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने शेती मालाला योग्य भाव मिळावा यासाठी कृषी मूल्य आयोगाची स्थापना केली असून आयोगाने व राज्य शासनाने केंद्रीय कृषी मूल्य आयोगाकडे केलेल्या शिफारशीपेक्षा १० टक्के वाढीव किंमत शेत मालाला देण्यात यावी, अशी मागणी मा.सहकार मंत्री यांनी दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केंद्र शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील १० वर्षापासून या आयोगाने पाठविलेल्या भावाच्या शिफारशीमध्ये केंद्र शासन ३० ते ५० टक्के कपात करीत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, मा.सहकार मंत्री यांनी केल्लेया विनंतीबाबत राज्य शासनाने पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०४-२०१९) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) किमान आधारभूत किंमत जाहीर करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे. कृषि विभागातील राज्य कृषि मूल्य आयोगामार्फत उत्पादन खर्चावर आधारित किंमती, केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाकडे प्रस्तावित करण्यात येतात. केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाकडून ही किंमत निर्धारीत करतांना अन्य राज्यातील संबंधित पिकांसाठी येणाऱ्या उत्पादन खर्चाबरोबरच इतर घटकांचाही विचार करुन विविध पिकांच्या किमान आधारभूत किंमतींची शिफारस केंद्र शासनाला करण्यात येते आणि केंद्र शासन राष्ट्रीय स्तरावर आधारभूत किंमत योजनेत समाविष्ट शेतमालाच्या आधारभूत किंमती निश्चित करुन जाहीर करते. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या शेतमालाच्या आधारभूत किंमती सर्व राज्यांना लागू होतात.

केंद्र शासनाने खरीप हंगाम २०१८-१९ पासून शेतमालाला उत्पादन खर्चावर ५० टक्के नफा धरुन किमान आधारभूत किंमती जाहीर केल्या आहेत. उत्पादन खर्चावर आधारित भाव शेतमालाला मिळावेत म्हणून राज्य शासन केंद्र शासनाकडे नेहमीच आग्रही भूमिका घेत असते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परळ येथील नौरोसजी वाडीया मॅटर्निटी हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत**

**(२३) ११४४०६ (०६-०४-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळ येथील नौरोसजी वाडीया मॅटर्निटी हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांना ६ वा वेतन आयोगानुसार घ्यावयाच्या वेतन थकबाकीसाठीची मागणी लाल बावटा जनरल कामगार युनियन सन २००६ पासून प्रत्यक्ष भेटून निवेदनाद्वारे मागणी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाल बावटा जनरल कामगार युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनातील शासनाकडे प्रलंबित असलेल्या ६ व्या वेतन आयोगानुसार द्यावयाच्या वेतन थकबाकीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) नौरोसजी वाडिया मॅटर्निटी हॉस्पिटल या रुग्णालयास तत्कालीन मुंबई महानगरपालिका व श्री.वाडीया यांच्यामध्ये दिनांक-२७/०७/१९२६ रोजी झालेल्या ट्रस्ट डीड करारामधील तरतूदीनुसार सहाय्यक अनुदान दिले जाते. सदर ट्रस्ट डीडची तपासणी करुन सर्वंकष आढावा घेण्याकरीता शासनाने दिनांक १६ जुन, २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल सादर केला असुन तो शासन स्तरावर सखोल अभ्यासाधिन आहे.

---

**राज्यात कर्जमाफीनंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी होत नसल्याबाबत**

**(२४) ११४९०९ (०१-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने जाहिर केलेल्या कर्जमाफीनंतरही राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी झाले नाही. कर्जमाफीच्या घोषणेनंतरच्या ७ महिन्यात सुमारे १७५३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास बँकाकडून कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांपैकी ७० ते ८० टक्के शेतकरी कर्जाची परतफेड असून शेतकरी कर्जमाफीचा लाभ तुलनेत कमी शेतकऱ्यांना होत असल्याचे दिसून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे कर्जमाफी हा शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर परिणामकारक उपाय असल्याचे वाटत नाही, असे नीती आयोगाचे सदस्य प्रा.रमेश चंद यांनी म्हटल्याचे दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कर्जाव्यतिरिक्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या होण्यामागे इतर कोणत्या अडचणी आहेत. याचा तपास करण्यासाठी शासनाने एका समितीची नियुक्ती करून त्याद्वारे विपक्ष चौकशी अहवाल मागविणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०४-२०१९) :** (१) राज्यात दिनांक १ जुलै, २०१७ ते ३१ जानेवारी, २०१८ या ७ महिन्यांच्या कालावधीत एकूण १७३४ आत्महत्यांची प्रकरणे आढळून आली. त्यापैकी ७७० पात्र तर ४९१ प्रकरणे दिनांक २३ जानेवारी, २००६ च्या शासन निर्णयातील निकषात बसत नसल्याने अपात्र ठरविण्यात आली. तसेच पात्र प्रकरणी रु.१.०० लक्ष ची मदत देण्यात आली आहे.

(२) शेतकऱ्यांच्या अल्प व मध्यम मुदत थकीत शेती कर्जाची माफी करण्यासाठी व अल्पमुदत शेती कर्जाची परतफेड मुदतीत करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी शासन निर्णय, दिनांक २८ जून, २०१७ नुसार छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ जाहीर केली. या योजनेच्या अनुषंगाने लाभ घेण्यासाठी पहिल्या टप्प्यात दिनांक २२/०९/२०१७ पर्यन्त ५६,५९,३९३ शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज केले त्याची खाते संख्या ६९०३९०३ लाख आहे. सदर योजनेस शासनाने वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना दिनांक १ मार्च, २०१८ पासून ऑनलाईन अर्ज भरण्यासाठ‍ दिनांक १५ जून, २०१८ पर्यन्त मुदतवाढ देण्यात आली होती. दिनांक २२/०६/२०१८ अखेर ३७,६९,४३३ लाभार्थ्यांना रु.१५०४३,९६,४५,६२५.६२ लाभ देण्यात आलेला आहे. प्रलंबित शेतकऱ्यांच्या बाबतीत तालुकास्तरीय समितीकडून कार्यवाही चालू असून पात्र शेतकरी कर्जदारांना लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) शेतीवरील ताण कमी करण्यासाठी कर्जमाफी हा उपाय नसल्याचे निती आयोगाचे उपाध्यक्ष यांनी म्हटले असल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) व (५) अद्यापि असा निर्णय घेण्यात आलेला नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यामध्ये संभाव्य दरड कोसळणाऱ्या गावांच्या सुरक्षेच्या उपाययोजनेबाबत**

**(२५) ११६३९१ (०१-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील धोकादायक गावांचा शोध घेऊन पाहणी करण्याचे काम कॉलेज ऑफ इंजिनीरिंग ला दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील धोकादायक गावांचा शोध घेऊन एकूण २३ गावांना धोका असल्याचे कॉलेज ऑफ इंजिनीरिंग यांनी केलेल्या पाहणीतून समोर आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरड कोसळण्याचा धोका असलेल्या २३ गावांना पावसाळा सुरु होण्याच्या अगोदर तात्काळ उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०३-२०१९) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) संभाव्य दरड कोसळणा-या गावांच्या संरक्षणात्मक कामांबाबत निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यारंभाचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी व कार्यालयीन यंत्रणेमार्फत पुढील कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील पुरपुनर्वसन अंतर्गत पुनर्वसीत झालेल्या गावांमधील नागरी सुविधाबाबत**

**(२६) १२०२५३ (३१-०७-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील पुरपुनर्वसन अंतर्गत पुनर्वसीत झालेल्या गावांमध्ये नागरीसुविधेची कामे करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीवरुन मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या पत्रान्वये ग्रामविकास विभागाला कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्देशानुसार पुनर्वसित झालेल्या गावांमध्ये नागरी सुविधेची कामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) देगलुर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील १९८३ व १९८९ मधील पूरपुनर्वसित गावांमध्ये त्यांच्या मूळ पूरबाधित गावात ज्या सुविधा उपलब्ध होत्या त्या सुविधा शासनामार्फत पुरविण्यात आल्या आहेत. शासनाच्या प्रचलित पूरपुनर्वसन योजनेनुसार मूळ पूरग्रस्त गावात ज्या सुविधा उपलब्ध होत्या त्या सुविधा नवीन पुनर्वसित गावामध्ये शासनामार्फत फक्त एकदाच पुरविण्यात येतात. त्यानंतर त्या सुविधा पुढील देखभाल दुरुस्तीसाठी संबंधित जिल्हा परिषद /ग्राम पंचायतीकडे हस्तांतरीत करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयातील कृषीसेवक पदांच्या भरतीबाबत**

**(२७) १२३६०८ (०२-०८-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषीसेवक पदांच्या राज्य स्तरावरील भरतीमध्ये कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयांसाठी १७६ कृषी सेवक पदांच्या भरतीत स्थानिक उमेदवारांच्या निवडीमध्ये अन्याय झाला असून इतर जिल्हयातील उमेदवारांची सदरहु जिल्हयामध्ये निवड झाल्यामुळे नाराजी निर्माण झाली, तसेच कोकणातील स्थानिक उमेदवारांना कृषीसेवक व इतर शासकीय नोकरभरत्यांमध्ये ७०% आरक्षण देण्यात यावे अशी मागणी कोकण विभाग, कृषी पदवीधारक संघर्ष समितीने आपल्या निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री व कृषी मंत्री यांचेकडे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०३-२०१९) :** (१), (२) व (३) पेसा क्षेत्रातील रिक्त पदांवर फक्त स्थानिक क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचीच भरती करण्यात यावी, असा नियम आहे. त्यानुसार ठाणे/पालघर जिल्हयातील पेसा क्षेत्रातील ३४ पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरण्यात आली आहेत. पेसा क्षेत्राबाहेरील १७६ पदांसाठी उमेदवारांची निवड करताना उमेदवार स्थानिकच असावा असा नियम नाही, मात्र सदर पदांसाठी उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर पदांसाठी राज्यभरातील उमेदवार अर्ज करु शकतात. त्यानुसार सदरची निवड प्रक्रिया करण्यात आलेली आहे.

कोकण विभाग, कृषी पदवीधारक संघर्ष समितीने निवेदनाद्वारे स्थानिकांना ७०% आरक्षण देण्यात यावे, अशी मागणी केलेली आहे. सदर मागणी शासनाचे प्रचलीत नियम विचारात घेऊन तपासण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आसेगाव देवी (ता.बाभुळगांव जि.यवतमाळ) येथील मंजुर**

**प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामाबाबत**

**(२८) १२३७८६ (२५-०७-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसेगाव देवी( ता.बाभुळगांव जि.यवतमाळ) येथील मंजूर प्राथमिक आरोग्य उपकेन्द्राच्या इमारतीच्या बांधकामाबाबत सर्वेक्षण करण्यात आले परंतु अनेक महिन्याचा कालावधी उलटून सुध्दा कुठल्याही प्रकारचे बांधकाम झाले नसल्याचे दिनांक १४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर आरोग्य उपकेंन्द्राच्या इमारतीच्या बांधकाम पुर्ण करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य उपकेंन्द्राचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे अशत: खरे आहे.

आसेगाव देवी या उपकेंद्रासाठी अद्याप जागा उपलब्ध झालेली नाही.

(२) व (३) सदर उपकेंद्राच्या बांधकामासाठी निधी देण्यासाठी व जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ब-याच प्राथमिक आरोग्य केंद्र इमारती व वैद्यकीय अधिका-यांच्या निवासस्थानाच्या दुरुस्तीबाबत**

**(२९) १२५१४० (०६-०८-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती व वैद्यकीय अधिका-यांच्या निवासस्थानांची नादुरुस्ती झाली असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे जिल्हयाच्या साक्री तालुक्यातील नवापाडा, शिरसोले, कुडाशी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच दहिवेल येथील वैद्यकीय अधिका-याच्या निवासस्थान देखील नादुरुस्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वैद्यकीय अधिका-यांच्या इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती

कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) प्राथमिक आरोग्य केंद्र नवापाडा येथील इमारत मोडकळीस आली असल्याने ही इमारत पाडून पुनर्बांधणी करण्याची शिफ़ारस प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्यात आला आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र शिरसोल व कुडाशी या इमारतीत दुरूस्तीसाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य समितीने ठराव मंजूर केला असून सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साक्री, पिंपळनेर, जैताणे (ता.साक्री, जि.धुळे) येथील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकिय अधिका-यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३०) १२५१४१ (२८-०७-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातील बहुसंख्य ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकिय अधिका-यांची पदे रिक्त असल्याबाबत माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरमयान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धुळे जिल्हयातील साक्री तालुक्यातील साक्री, पिंपळनेर व जैताणे या तिन्ही ग्रामीण रुग्णालयात नियमित वैद्यकिय अधिक्षक/वैद्यकीय अधिका-यांची नेमणूक केलेली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकिय अधिक्षक/वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्यात सद्यस्थितीत ३६३ ग्रामीण रुग्णालये कार्यान्वित आहेत. सदर ग्रामीण रुग्णालयांना वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची प्रत्येकी ३ पदे याप्रमाणे एकुण १०८९ पदे मंजुर असुन त्यापैकी १०११ पदे भरलेली आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.

धुळे जिल्हयातील साक्री तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय साक्री, ग्रामीण रुग्णालय

पिंपळनेर, ग्रामीण रुग्णालय जैताणे येथे वैद्यकीय अधिक्षक संवर्गाचे प्रत्येकी १ पद याप्रमाणे ३ पदे मंजुर असुन ३ पदे रिक्त आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गाची प्रत्येकी ३ पदे याप्रमाणे एकुण ९ पदे मंजुर असुन ६ पदे भरलेली व ३ पदे रिक्त आहेत.
(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गाची वैद्यकीय अधिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी, गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाच्या रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने ८७७ रिक्त पदांची जाहिरात दि.२७.१२.२०१८ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली असुन ती पदे भरण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच सद्यस्थितीत नियमित भरलेल्या पदांव्यतिरिक्त रिक्त राहणाऱ्या पदी नियमित पदे भरेपर्यंत बंधपत्रीत/कंत्राटी उमेदवार देवून त्याद्वारे आरोग्य सेवा दिली जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भातकुली (ता.भातकुली, जि.अमरावती) येथील लेडीं नाल्याला पूर संरक्षक भिंत बांधकामाबाबत**

**(३१) १२५४२२ (३१-०७-२०१८). श्री.रवि राणा (बडनेरा)** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भातकुली (ता.भातकुली, जि.अमरावती) येथील शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या लेंडी नाल्याला पूर येऊन नुकसान झाले तसेच लेंडी नाला पेढी नदीला जाऊन मिळत असल्याने नदीच्या पूर येवून पाणी नाल्याच्या माध्यमातून गावात शिरून लोकवस्तीचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पेढी नदीवर निम्न पेढी प्रकल्पाचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून या पेढी नदीला जोडून असलेल्या लेंडी नाल्याला पेढी प्रकल्पाच्या प्राप्त निधीतून पूर संरक्षण भिंतीचे बांधकाम करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लेडीं नाल्याला पूर संरक्षक भिंत बांधकामाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०४-२०१९) :** (१), (२) व (३) सन २००७, २००९ व २०१३ यावर्षी लेंडी नाल्याला पूर आला होता. भातकुली नगरपंचायत मार्फत सन २०१६ मध्ये लेंडी नाल्याचे खोलीकरण करण्यात आले आहे. तद्नंतर कोणत्याही प्रकारचा पुराचा धोका निर्माण झालेला नाही.

कार्यकारी अभियंता, अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्र.१, अमरावती यांनी लेंडी नाल्याला संरक्षक भिंत बांधण्याच्या कामाची तांत्रिकदृष्ट्या तपासणी केली असता, सदर काम मापदंडात बसत नसून अव्यवहार्य ठरते, असे अभिप्राय दिले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाडी (ता.पाटण, जि.सातारा) येथील वांग-मराठवाडी धरणासाठी श्री आनंदराव मराठे यांनी**

### दिलेल्या जमिनीचा पाठपुरावा मोबदला त्यांच्या वारसांना देण्याबाबत

**(३२) १२६६४१ (१०-१२-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडी (ता.पाटण, जि.सातारा) येथील वांग-मराठवाडी धरणासाठी दिलेल्या जमिनीचा पाठपुरावा मोबदला न मिळाल्याने श्री आनंद राव मराठे या शेतकऱ्याचा मृत्यु झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री. आनंदराव मराठे यांचा मृत्यू हा दफ्तर दिरंगाईमुळे झाला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार श्री.आनंदराव मराठे यांच्या जमिनीचा मोबदला त्यांच्या वारसांना देण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारावाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सदर खातेदारास देय पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आले आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

### टेंभू (जि.सांगली) योजनेच्या लाभक्षेत्रातील ठिंबक अनुदान बंद केल्याबाबत

**(३३) १२६७९२ (०६-१२-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभू (जि.सांगली) योजनेच्या लाभ क्षेत्रातील ठिंबक अनुदान बंद करण्याबाबत शासनाने अध्यादेश काढून माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठिबक अनुदान बंद केल्यामुळे शेतक-यामध्ये निराशा निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेच्या निर्णयाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०३-२०१९) :** (१), (२), व (३) दि.२४ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयान्वये, ऊस पिकाखालील क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्यासाठी, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करुन देण्याची योजना आखण्यात आली आहे. सदर योजना प्राथम्याने, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दि.२५ जून, २०१५ च्या अधिसुचनेन्वये, बारमाही पिकासाठी जून, २०१८ पर्यंत सूक्ष्म सिंचन बंधनकारक केलेल्या

राज्यातील ८ प्रकल्पांच्या लाभ क्षेत्रामध्ये राबविण्याचे नियोजित आहे. यामध्ये टेंभू उपसा सिंचन योजना (जि.सांगली) चा समावेश आहे.

सदर शासन निर्णयानुसार, ज्या भागामध्ये ही योजना राबविल्या जाईल त्या भागामध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन योजना राबविण्यात येणार नाही. तथापि, सन २०१७-१८ या वर्षात या प्रकल्पाच्या क्षेत्रामध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचन योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे. सन २०१८-१९ या वर्षामध्ये सुध्दा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचन योजना राबविण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांच्या कुलगुरु पदाच्या निवडीबाबत

**(३४) १२७२९३ (०६-१२-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांच्या कुलगुरु पदाच्या निवडीसाठी लावण्यात आलेले निकष हे नैसर्गिक न्यायाला धरुन नसून त्यामुळे कृषि तंत्रज्ञान, उद्यान विद्या, वनशास्त्र या शाखांच्या उमेदवारांना कधीच कुलगुरु होता येणार नाही, यामुळे या अन्यायकारक निकषांचा फेरविचार करण्याची मागणी कृषी प्राध्यापकांनी माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०४-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रायगड जिल्हयातील तीन प्रमुख ठिकाणी जेटी उभारण्याबाबत

**(३५) १२७२९९ (०४-१२-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील तीन प्रमुख ठिकाणी अत्याधुनिक सोयींनी मच्छिमार जेटी उभारण्यात येत असून त्याकरिता नाबार्डकडून ६४ कोटीचे अर्थसहाय देण्यात येणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधीतून कोणकोणती कामे घेण्यात येणार असुन सदरहू कामे किती

कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०१-०३-२०१९) :** (१) नाबार्ड टप्पा अंतर्गत रायगड जिल्ह्यासाठी घेण्यात येणाऱ्या कामांचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | टप्पा क्र | कामांची नावे | एकूण प्रकल्प किंमत |
|---|---|---|---|
| १ | नाबार्ड टप्पा २० | १) नवापाडा कोळीवाडा, ता. उरण<br>२) थेरोंडा, ता.अलिबाग<br>३) एकदरा, ता.अलिबाग | रू. ६७.०० कोटी |
| २ | नाबार्ड टप्पा २२ | १) बोर्ली मांडला, ता.मुरुड | रू. १२.५६ कोटी |
| ३ | नाबार्ड टप्पा २३ | १) दिघी, ता.श्रीवर्धन<br>२) राजपुरी, ता.मुरुड<br>३) वेलदूर, ता.गुहागर | रू. ३१.६८ कोटी |

(२) नाबार्ड अर्थसहाय्यित मालिका २० अंतर्गत एकदरा नवापाडा, थेरोंडा ही कामे ६७ कोटी रक्कमेची मंजूर असून ही कामे मार्च २०१९ पर्यंत व नाबार्ड मालिका २२ अंतर्गत बोर्ली मांडला येथील १२.५६ कोटी रक्कमेचे काम मंजूर असून जुलै २०१९ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. नाबार्ड मालिका २३ अंतर्गत दिघी व राजपुरी येथील रू.२३.४३ कोटी रक्कमेची कामे मंजूर असून या कामांचे संकल्पन केंद्रिय जल व उर्जा संशोधन संस्था, (CWPRS) पुणे यांचेमार्फत सुरू आहे. केंद्रिय जल व उर्जा संशोधन संस्था, (CWPRS) पुणे कडुन सविस्तर आराखडे प्राप्त होताच तांत्रिक मान्यता प्राप्त करुन घेऊन निविदा प्रकिया राबविण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी विनापरवानगी गैरहजर असल्याबाबत

**(३६) १२७४४१ (११-१२-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय प्राथमिक आरोग्य केंद व रुग्णालयात कर्तव्यावर असलेला वैद्यकीय अधिकारी विनापरवानगी गैरहजर राहिल्यामुळे उपचारा अभावी रुग्णांचा तसेच प्रसुती दरम्यान मातेचा अथवा बालकाचा मृत्यू होत असल्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विनापरवानगी गैरहजर राहिलेल्या संबधित वैद्यकीय अधिका-यांना तात्काळ निलंबित करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून निलंबित करण्यात आल्यानंतर महाराष्ट्र मेडिकल कॉन्सीलकडे अशा डॉक्टरांची नोंदणी रद्द करण्याची शिफारस देखील राज्य शासन करणार आहे, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, सदर निर्णयाच्या अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कायवाही केली

वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

विनापरवाना गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांचा अतिरिक्त कार्यभार अन्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडे सोपवून तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांना, गरोदर माता व नवजात बालकांना वेळेवर उपचार देण्यात आले आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) अनधिकृत गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा समाप्तीची कार्यवाही संचालनालय व शासन स्तरावर सुरु असून त्यानुसार सर्व अनधिकृत गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा समाप्तीची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र मेडीकल कॉन्सिलकडे त्यांच्या नोंदणी रद्द करण्याची शिफारस शासनाकडून करण्यात येईल.
(४) कार्यवाही सुरु असल्याने विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँकेकडून (नाबार्ड) प्रसिध्द करण्यात आलेल्या सर्वेक्षण शेती उत्पन्नात घट झाल्याबाबत**

**(३७) १२७४४६ (०६-१२-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँकेकडून (नाबार्ड) माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिध्द करण्यात आलेल्या सर्वेक्षण अहवालात ग्रामीण भागातील शेती उत्पन्नात घट झाल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अहवालात आणखी कोणत्या बाबी नमूद करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, त्यानुसार ग्रामीण भागातील शेती उत्पन्न सुधारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नससल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँकेकडून (नाबार्ड) प्रसिध्द करण्यात आलेल्या सर्वेक्षण अहवालात ग्रामीण भागातील शेती उत्पन्नात घट झाल्याचे आढळून येत नसून, ग्रामीण भागातील शेती उत्पन्नात वाढ झाल्याचे दिसून येत आहे.
(२) सदर अहवालात भारतातील कृषि क्षेत्रातील उत्पन्न, विशिष्ट पीकांची उत्पन्नातील कामगिरी तसेच पीकांचा वृध्दी दर, उत्पन्न खर्च, कृषि क्षेत्रातील आदानांचा वृध्दी दर, पशुधन विकास, ग्रामीण अर्थव्यवस्था, इत्यादी बाबी नमूद करण्यात आल्या आहेत.
(३) शेतक-यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिने जागतिक बँक सहाय्यित नानाजी देशमुख कृषि

संजीवनी प्रकल्प, राष्ट्रीय कृषि विकास योजना, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना, शेतक-यांच्या गटशेतीस चालना देणे, मुख्यमंत्री कृषि आणि अन्न प्रक्रीया योजना, जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना इत्यादी योजना राबविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील कामगारांसाठी "ईएसआय" रुग्णालय सुरू करण्याबाबत**

**(३८) १२८१३८ (११-१२-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील कामगारांच्या उपचारांची गैरसोय होऊ नये म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधीनी सातत्याने पाठपुरावा करून सुरू केलेल्या "ईएसआय" रुग्णालयात अद्यापपर्यंत कामगारांना उपचार सेवा सुरु झाली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील २० वर्षापासून अधिक काळ बंद असलेल्या सदर रुग्णालयाची इमारतीची दुरुस्ती करुन नविन कक्ष स्थापन करुन डॉक्टरांच्या नियुक्त्याही करण्यात आलेल्या असतांनाही उद्‌घाटनाअभावी हे रुग्णालय अद्यापही सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(३) तसेच, सदरचे रुग्णालायात औषधांचा तुटवटा व अत्याधुनिक सोयीसुविधा अभाव असल्याने सदर रुग्णालय सुरू होत नसल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरचे रुग्णालय पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०४-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
राज्य कामगार विमा महामंडळ प्रादेशिक कार्यालय, मुंबई यांनी कळविल्याप्रमाणे सदर रुग्णालयात बाहयरुग्ण विभाग सुरु करण्यात आला असून आंतररुग्ण विभाग सुरु करण्याची कार्यवाही चालू आहे.
(२) व (३) राज्य शासनाने सदर रुग्णालय राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्याकडे हस्तांतरीत केले आहे. सदर रुग्णालयात बाहयरुग्ण विभाग सुरु करण्यात आल्याचे तसेच त्यासाठी पुरेशा प्रमाणात औषध उपलब्ध असल्याचे सहाय्यक संचालक, प्रादेशिक कार्यालय, राज्य कामगार विमा महामंडळ, मुंबई यांनी कळविले आहे.

(४) राज्य कामगार विमा महामंडळ प्रादेशिक कार्यालय, मुंबई यांनी कळविल्याप्रमाणे, सदर रुग्णालयातील आंतररुग्ण विभाग सुरु करण्यासाठी दुरुस्ती/नुतनीकरणा करीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यांच्याकडून त्यावर खुलासा मागविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इगतपुरी (जि.नाशिक) येथे ट्रामा केअर सेटर सुरु करण्याबाबत.**

**(३९) १२८७१८ (१०-१२-२०१८). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इगतपुरी (जि.नाशिक) येथील ग्रामीण रुग्णालयाशेजारी असलेले ट्रामा केअर सेंटर वैद्यकीय अधिकारी व यंत्रसामग्री नसल्याने मागील तीन वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक-मुंबई महामार्गावर कसारा घाटात झालेल्या अपघातांतील रुग्णांना ५० कि. मी. दूर नाशिक जिल्हा रुग्णालयात दाखल करावे लागत असल्याने इगतपुरी येथील ट्रामा केअर सेंटर तातडीने सुरु करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी वैद्यकीय अधिकारी यांना दिनांक २९ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने इगतपुरी येथील ट्रामा केअर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
ट्रामा केअर सेंटर इगतपुरी येथील इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असून सदर इमारतीस वीज व पाणी पुरवठा अद्याप सुरू झाला नाही. त्यामुळे सदर ट्रामा केअर सेंटरची इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हस्तांतरीत झालेली नाही.
(२) हे खरे आहे.
(३) इगतपुरी, जि. नाशिक येथील ट्राम केअर युनिट च्या इमारतीस विद्युत व पाणी पुरवठा सुरू करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे. तसेच ट्रामा केअर सेंटरसाठी मनुष्यबळ व साधन सामुग्री मंजूरीचा प्रस्ताव आरोग्य सेवा संचालनालयामार्फ़त सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूरातील गोकुळ दुध संघातील कर्मचारी नोकर भरतीबाबत

**(४०) १२९६६७ (३०-११-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरातील गोकुळ दुध संघाच्या कर्मचारी नोकर भारतीत हस्तक्षेप करून मा.दुग्धविकास मंत्री यांनी घेतलेल्या निर्णया विरोधात दाखल याचिकेची उच्च न्यायालयाने दखल घेतल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०७-०३-२०१९) :** (१) कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ) मधील कर्मचारी भरतीबाबत श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, मा.विधानपरिषद सदस्य यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ, मुंबई येथे ऑगस्ट,२०१८ मध्ये याचिका क्र.९३७८/२०१८ दाखल केली आहे.

(२) होय.

(३) रिट पिटीशन क्र. ९३७८/२०१८ मध्ये मा.उच्च न्यायालयात दाखल करावयाच्या शपथपत्रास शासन मान्यता देण्यात आली असून प्रतिवादी क्र.१,२ व ३ च्या वतीने शपथपत्र दाखल करण्याकरीता सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध),मुंबई यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

तथापि सदर याचिकेमध्ये प्रतिवादी क्र.२ वर मा.मंत्री (पदुम) यांना नावानिशी प्रतिवादी केल्यामुळे सरकारी वकीलांना प्रतिवादी क्र.२ च्या वतीने न्यायालयात हजर राहून प्रकरण हाताळण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राहुरी (जि.अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयासाठी नवीन इमारत उभारण्यासह आवश्यक औषधांचा पुरवठा करण्याबाबत

**(४१) १२९७१३ (१०-१२-२०१८). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर)** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहुरी (जि.अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयासह चार ही उपकेंद्राना इमारती नसल्याने तेथे रुग्णांवर प्राथमिक उपचार वगळता इतर आजारांवरील उपचार जवळपास बंदच आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आरोग्य केंद्र व उपकेंद्रात ५३ कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने तेथील रिक्त पदे भरण्यासह आवश्यक औषधांचा पुरवठा करणे व या रुग्णालयांसाठी नविन इमारती उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रूग्णालय, राहुरी येथे जागा नसल्याने बांधकाम करण्यात आले नाही. तथापि नगरपरीषदेच्या इमारतीत ग्रामीण रूग्णालय भाडे तत्वावर कार्यान्वित आहेत. ३८ पैकी ४ उपकेंद्रांना स्वत:च्या इमारती नसून सदर उपकेंद्रे भाड्याच्या जागेत कार्यरत आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

राहुरी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांमध्ये एकूण मंजूर ९१ पदांपैकी ७२ पदे भरली आहेत व १९ पदे रिक्त आहेत.

(३) व (४) रिक्त पदे असलेल्या ठिकाणी अतिरिक्त कार्यभार जवळील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील कर्मचा-यांकडे सोपविण्यात आलेला आहे. तसेच रिक्त असलेली पदे भरण्याकरीता जिल्हा परिषदेमार्फ़त कार्यवाही सुरू आहे.

सर्व उपकेंद्रांना त्यांच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फ़त औषधांचा पुरवठा करण्यात येतो.

राहुरी तालुक्यात एकूण ३८ उपकेंद्र मंजूर असून ३४ उपकेंद्रांचे बांधकाम पूर्ण होऊन स्वत:च्या इमारतीत कार्यान्वित आहेत. उर्वरीत ४ उपकेंद्राच्या इमारत बांधकामाकरीता जागा प्राप्त करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. सद्यस्थितीत मुळानगर, देसवंडी व राहुरी फ़ॅक्टरी ही तीन उपकेंद्रे खाजगी जागेत कार्यरत आहेत व उपकेंद्र गुहा हे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीत कार्यरत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### देवरी-आमगांव (ता.सालेकसा, जि.गेंदिया) येथे तालुका दुध संघाची स्थापना करण्याबाबत

**(४२) १३०४६७ (३०-११-२०१८). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरी-आमगांव (ता.सालेकसा जि. गेंदिया) येथे तालुका दुध संघाची स्थापना करण्याबाबत मा. दुग्धविकास मंत्री यांचेकडे दिनांक १८ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास स्थनिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०६-०३-२०१९) :** (१) होय.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व शासन निर्णय दि.१५/९/२००५ मधील तरतूदीनुसार नियोजीत तालुका सहकारी दूध संघाचा परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), मुंबई यांच्या शिफारशीसह वरिल संघाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर शासन निर्णय दि.१५/९/२००५ मधील तरतूदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नाशिक जिल्हयात शेतीचे नुकसान झाल्याबाबत

**(४३) १३०४९८ (०४-१२-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात वाढती महागाई, निकृष्ट बियाणांसह अवेळी पाऊस यामुळे शेती व्यवसायाचे नुकसान होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेती उत्पादन वाढविण्यासाठी मशागतीच्या कामासाठी प्रति हेक्टरी २५ हजार रुपये अनुदान रोजगार हमी योजनेतून देण्यात यावे, अशी मागणी इगतपुरी तालुका श्रमजीवी संघटनेच्या वतीने तहसिल कार्यालयाजवळ मोर्चाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) होय. श्रमजीवी संघटनेचे अशा आशयाचे पत्र तहसिल कार्यालय, इगतपूरी यांना प्राप्त झाले आहे.

(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसंदर्भातील केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेमधील मुद्दा क्र.७.३.२ मध्ये सर्वसाधारण कृषि विषयक कामे उदा.जमीन तयार करणे, नांगरणी, पेरणी, गवत कापणी, पाणी देणे, पिक कापणी, रोपांची छाटणी यासारखी कामे

अनुज्ञेय नसल्याचे नमूद करण्यात आले असल्याने शेतीशी संबंधित सर्व कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मगांराग्रारोहयो) मधून घेता येणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अलिबाग (जि.रायगड) तालुक्यामधील मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या इमारत बांधकामाबाबत**

**(४४) १३०५८४ (१०-१२-२०१८). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यामधील मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्राची इमारत जीर्ण झालेली असल्यामुळे सन २००४ पासून वापराविना असून सदर ठिकाणी नवीन इमारत बांधण्याचा प्रस्ताव सन २०११ मध्ये मत्स्यव्यवसाय विभागाने शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीच्या ठिकाणी इमारत उभारण्याच्या कामाला कार्यादेश मिळूनही इमारतीचे बांधकाम सुरु झाले नसुन जीर्ण झालेली इमारत पडू शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्राची इमारत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०६-०३-२०१९) :** (१) होय.
(२) व (३) इमारतीची जागा ही समुद्र किनाऱ्याजवळ असल्याने तेथील जमीन पुळणयुक्त (sandysoil) आहे. याकरीता इमारतीच्या पायासाठी आर.सी.सी. बांधकामाचे अचूक संकल्पन प्राप्त करुन घेण्यात आले असून जीर्ण इमारत पूर्ण पाडून संकल्पनानुसार काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे धाड (ता.जि.बुलढाणा) येथील पशु रूग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४५) १३०७३९ (१५-१२-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे धाड (ता.जि.बुलढाणा) येथील पशु रूग्णालयातील पशुवैद्यकीय अधिका-याचे पद रिक्त असल्यामुळे जनावरांना वेळेवर उपचार मिळत नसल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे धाड येथील पशु रूग्णालयातील पशुवैद्यकीय अधिका-याचे पद भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२८-०२-२०१९) :** (१) मौजे धाड, ता.जि.बुलढाणा येथे श्रेणी-१ चा पशुवैद्यकीय दवाखाना असून, त्यामध्ये पशुधन विकास अधिकारी या संवर्गाचे एक मंजूर पद आहे. सदर पद सध्यस्थितीत रिक्त असून, रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिका-याकडे सोपवून पशुपालक शेतक-यांच्या जनावरांना नियमित वैद्यकीय सेवा-सुविधा पुरविण्यात येत आहेत.
(२) व (३) भविष्यामध्ये सरळ सेवेने पशुधन विकास अधिका-यांची पद भरती आल्यानंतर मौजे धाड, ता.जि.बुलढाणा येथील पशुधन विकास अधिकारी या संवर्गातील रिक्त पद प्रथम प्राधान्याने भरण्यात येईल.

---

## पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यामधील पशु वैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदे भरण्यासह लाळ खुरकत या आजाराने मृत झालेल्या जनावरांच्या मालकांना भरपाई देण्याबाबत

**(४६) १३१२४१ (१५-१२-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यामध्ये सुमारे १ लक्ष ५४ हजार जनावरे असुनही पशु वैद्यकीय सेवा देणारी शासकीय यंत्रणा व डॉक्टर यांची पदे रिक्त असल्यामुळे जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असुन पंढरपूर तालुक्यात २४ दवाखाने कार्यरत असून त्यापैकी श्रेणी-१ चे १४ तर श्रेणी-२ चे ७ दवाखान्यांतील अधिकाऱ्यांची एकूण १८ पदे मंजूर असतांना ६ पदे रिक्त आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच नंदेश्वर, खडकी, जुनोनी, गोणेवाडी, शिरसी, सिध्दनकेरी (ता.मंगळवेढा,जि.सोलापूर) येथे श्रेणी-१ च्या पशु वैद्यकीय दवाखान्यातील एकूण ५ पदे मंजूर असुन त्यातील ३ पदे रिक्त असल्याने सुमारे २० हजार जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असुन सदर दवाखाना जीर्ण व मोडकळीस आल्यामुळे नवीन इमारत बांधकामासाठी शासनाने २५ लक्ष रूपयांचा निधी ६ महिन्यापूर्वी मंजुर करुनही अद्याप बांधकाम केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिरशी, नंदेश्वर, सलगर, गोणेवाडी, मारापूर,लक्ष्मी दहिवडी (ता.मंगळवेढा व पंढरपूर, जि.सोलापूर) या गावांसह दोन्ही तालुक्यातील लाळ खुरकत या रोगाने आजारी पडून सुमारे ११ जनावरे मृत पावली असून ३०० जनावरांना आजाराची लागण झाली असुन गेल्या दीड वर्षापासून लाळ खुरकत रोगाची लस वेळेवर उपलब्ध न झाल्याने जनावरांना, पशुंना वेळेत लसीकरण होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोलापूर जिल्हयातील पशु वैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदे भरण्यासह नवीन इमारतीच्या बांधकामाबाबत तसेच जनावरांची तपासणी व लसीकरण करण्यासोबत लाळ खुरकत या आजाराने मृत झालेल्या जनावंरांच्या मालकांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२८-०२-२०१९) :** (१) व (२) गळवेढा तालुक्यात गाय वर्ग व म्हैस वर्ग असे एकूण ९४८८१ इतके पशुधन आहे. व पंढरपूर तालुक्यातील गाय वर्ग व म्हैस वर्ग असे एकूण १५४५९४ इतके पशुधन आहे. पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील मंजूर पदांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र | तालुका | श्रे-१ व २ चे दवाखाने | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| १) | मंगळवेढा | पविअ गट-अ | ९ | ३ | ६ |
| | | सपविअ/प.प. | ५ | ४ | १ |
| | | परिचर | १३ | १३ | ० |
| | | एकूण | २७ | २० | ७ |
| २ | पंढरपूर (स्थानिक) | पविअ,गट-अ | १७ | ११ | ०६ |
| | | सपविअ/प.प. | ०७ | ०६ | ०१ |
| | | परिचर | २२ | १६ | ०६ |
| | (राज्यस्तर) | सहा आयु (पसं) | १ | १ | ० |
| | | पविअ, गट-अ | ०१ | ०१ | ०० |
| | | पशुधन पर्यवेक्षक | ०१ | ०१ | ०० |
| | | परिचर | ०१ | ०० | ०१ |
| | | एकूण | ५० | ३६ | १४ |

सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या पशुवैदयकीय अधिकारी व कर्मचारी यांचेकडे सोपवून सर्व पशुपालकांना नियमित पशुवैदयकीय सेवा सुविधा पुरविण्यात येत आहेत.तसेच जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेली नाही.
(३) व (४) पशुधन विकास अधिकारी,गट-अ या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे ४६० पदांचे मागणीपत्र दि.२७.१२.२०१८ रोजी पाठविण्यत आले आहे. भविष्यात सरळसेवा व पदोन्नतीच्या मार्गाने पदभरती करताना मंगळवेढा व पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील वरील प्रमाणे रिक्त असलेली पदे भरण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

पशुवैदयकीय दवाखाना श्रेणी-१,नंदेश्वर ता.मंगळवेढा साठी २०१७-१८ मध्ये वार्षिक योजने अंतर्गत मुख्य इमारत बांधकामासाठी २५.०० लक्ष इतका निधी मंजूर असून सदर कामाचा कार्यारंभ आदेश दि.०५.१२.२०१८ रोजी देण्यात आलेला असून दवाखाना बांधकामाची सुरुवात झाली आहे व काम प्रगती पथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या बांधकामाबाबत**

**(४७) १३२२५० (०४-१२-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी, करमाळा या कार्यालयासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी तहसिल कार्यालय, करमाळा येथील आवारात २००० चौ.फूट जागा उपलब्ध करुन दिली असल्याने उक्त कार्यालयाच्या नकाशा, मोजणी व इतर बाबींसाठी रु.१२५०००/- अनुदान देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.कृषीमंत्री यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या बांधकामासंदर्भात मा.कृषीमंत्री यांनी दिनांक ५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदरहू मागणी व आश्वासनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दि.२७.०९.२०१८ च्या पत्रान्वये तालुका कृषी अधिकारी, करमाळा या कार्यालयासाठी तहसिल कार्यालय, करमाळा आवारात २००० चौ.फूट जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानुसार सदर जागेची मोजणी, नकाशा व इतर अनुषंगिक बाबींसाठी विभागीय कृषि सहसंचालक, पुणे यांनी दि.२७.११.२०१८ च्या आदेशान्वये रुपये १,१७,०००/- निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. उप अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय यांनी जागेची मोजणी व नकाशा उपलब्ध करुन दिल्यानंतर व सदरची जागा कृषि विभागाच्या नावे झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अंदाजपत्रक तयार करुन इमारत बांधकामासंदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी (जि.रत्नागिरी) जिल्हा परिषदेतंर्गत पशुसंवर्धन विभागात असलेल्या रिक्त पदांबाबत**

**(४८) १३२९०७ (१५-१२-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी (जि.रत्नागिरी) जिल्हा परिषदेतंर्गत पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी (गट-अ) ची अनेक पदे रिक्त असुन रत्नागिरी जिल्ह्यातील नऊ तालुक्यांपैकी एका तालुक्यात पशुधन विकास अधिकारी (विस्तार) हे एकच पद भरलेले असून उर्वरीत आठ तालुक्यांमध्ये पशुधन विकास अधिकारी (विस्तार) ही पदे रिक्त असल्यामुळे पशुधन वैद्यकीय सेवेत विलंब होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पशुधन विकास अधिकारी (विस्तार) ७ पदे, पशुधन विकास अधिकारी (तांत्रिक) १ पद व सधन कुक्कट विकास अधिकारी १ पद अशी एकूण पशुधन विकास अधिकारी यांची ९ पदे तातडीने भरणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.पशुसंवर्धन मंत्री यांना निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवदेनाच्या अनुषंगाने सदरची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२८-०२-२०१९) :** (१) रत्नागिरी जिल्हयामध्ये पशुसंवर्धन विभागामध्ये मंजूर, भरलेल्या व रिक्त पदांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| स्थानिक स्तर | | | | |
| १. | प.वि.अ. | ३३ | ०८ | २५ |
| राज्य स्तर | | | | |
| १. | जिपउआ | ०१ | ० | ०१ |
| २. | सहा आयु पसं | ०७ | ०३ | ०४ |
| ३. | पविअ | ०९ | ०४ | ०५ |
| ४. | सपविअ | ०५ | ०५ | ० |
| ५. | पप | ८१ | १८ | ६३ |
| एकूण | | १०३ | ३० | ७३ |

रत्नागिरी जिल्हा परिषदेअंतर्गत पशुधन विकास अधिकारी या संवर्गात वरील विवरणपत्रात दर्शविल्यानुसार रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिका-याकडे सोपवून पशुपालकधारक शेतक-यांच्या जनावरांना नियमित वैद्यकीय सेवा-सुविधा पुरविण्यात येत आहेत.
(२), (३) व (४) रत्नागिरी जिल्हयात पशुधन विकास अधिकारी(गट-अ) या संवर्गात रिक्त असलेली पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. पशुधन विकास अधिकारी(गट-अ) या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात ४६० पदांचे मागणीपत्र दि.२७/१२/२०१८ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. तसेच पशुधन विकास अधिकारी(गट-ब) या संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. सदर पद भरती करतांना रत्नागिरी जिल्यातील पशुधन विकास अधिकारी या संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**राज्यातील राज्य कामगार विमा रुग्णालयांतील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४९) १३३६५५ (१०-१२-२०१८). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १५ राज्य कामगार विमा रुग्णालयांत (ईएसआय) २०६ डॉक्टर, ३६८ परिचारिका, २५४ निमवैद्यक आणि ३६३ इतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील रिक्त पदांमुळे तेथे येणा-या रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयांत कर्मचाऱ्यांची पदे रिक्त रहाण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर रुग्णालातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०१९) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत राज्य कामगार विमा योजनेत एकूण ११ रूग्णालये कार्यान्वित असून अंधेरी, कोल्हापूर व बिबवेवाडी तसेच महात्मा गांधी रूग्णालय केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील महामंडळाअंतर्गत आहेत. राज्य कामगार विमा योजनेमध्ये काही प्रमाणात रिक्त पदे दिसून येत असली तरी त्याचा रूग्णसेवेवर परिणाम दिसून येत नाही.

(३) व (४) गट-अ व गट-ब संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू असून आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांचेमार्फत राज्य कामगार विमा योजनेतील रिक्त पदे भरण्याकरीता महाऑनलाईनमार्फत नोव्हेंबर, २०१७ मध्ये गट-क मधील परिचारिका -३७२ पदे व समवैदयकीय - ११६ पदे पदभरतीची प्रक्रिया राबवून भरण्यात आलेली आहेत व गड-ड संवर्गाची बिंदूनामावली प्रमाणित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोपरगांव (जि.अहमदनगर) येथे उपजिल्हा रुग्णालयासह ट्रामा केअर सेंटर सुरु करण्याबाबत**

**(५०) १३३८२२ (११-१२-२०१८). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगांव (जि.अहमदनगर) येथील उपजिल्हा रुग्णालयाची मागणी लोकप्रतिनिधी वारंवार करुनही रुग्णालयाची श्रेणीवाढ होत नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कोपरगांव येथील ग्रामीण रुग्णालयात ट्रामा केअर सेंटर सुरु करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधी केलेल्या उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) ट्रामा केअर सेंटरच्या बांधकामाचे अंदाजपत्रक सादर करणेबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कोपरगाव यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत आरोग्य संस्थांचा जोड- बृहत आराखडा तयार करण्याचे काम आरोग्य सेवा संचालनालयस्तरावर सुरू असून कोपरगाव ग्रामीण रूग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्याची मागणी निकषानुसार जोड-बृहत आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.